नियमित फौजदारी खटला नं.३८१/२०२४
निशाणी- ३३

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- संदिप पांडुरंग केरुळकर
वयः- ४८ वर्षे, धंदाः- पो. हे. कॉ. ब. नं. ३७०
नेमणुक - श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन, जि. अहिल्यानगर

<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-</u>

१. सन २०२३ मध्ये मी तोफखाना पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉनस्टेबल या पदावर कार्यरत होतो. पोलीस ठाणे अमंलदार यांनी फिर्याद नोंदवुन सदर गुन्हा रजि. नं. ७५६/२०२३ दाखल करुन भा. द. वि. कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हयाचा तपास माझ्याकडे दिला. आता मला दाखविलेला आदेश तोच आहे. त्यावर ठाणे अमंलदार यांची सही आहे. त्यास <u>नि.३४</u> देण्यात येते. त्यासोबत मला फिर्याद, फिर्यादची स्थळप्रत, एफआयआरची प्रत, दैनिक अहवाल देण्यात आला. सदर फिर्यादचे अवलोकन करुन तपास सुरु केला. फिर्यादीने घटनास्थळ दाखविले. मी दोन पंचा समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>नि.३५</u> देण्यात येते. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तारकपुर आगार येथे सीसीटीव्ही फुटेज मिळणेसाठी पत्र दिले. मला दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.त्यास <u>नि.३६</u> देण्यात येते. माझी बदली झाल्यामुळे मी सदर गुन्हा पोलीस स्टेशनला जमा केला. पुढील तपास पोलीस हेड कॉनस्टेबल सुनिल आंधळे यांचेकडे गेला.

सरतपास पूर्ण.

<u>उलट तपास आरोपी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. बी. एम. झगडे यांचेकडूनः-</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमध्ये फिर्यादीचे दागिने कोठून चोरी गेले याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा खोटा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे चुकीचे जबाब नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास आरोपी क्र. २ व ३ तर्फे विधिज्ञ श्री. हानिफ शेख याचे सहकारी विधीज्ञ श्रीमती एच. आय. सय्यद यांचेकडून:-</u>

३. आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. बी. एम. झगडे यांनी घेतलेला उलटतपास स्वीकारला.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID #6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:45:57 +0530

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. ०९/०३/२०२६
अहमदनगर